फिर्यादी प्रत



I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S. (पोलीस ठाणे):** भाग्य नगर **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0598 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/10/2026 18:54 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(२) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(१)(ब) |
| 4 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(१)इ |
| 5 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 49 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** गुरूवार **Date from (दिनांक पासून):** 01/10/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 01/10/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 12:00 तास **Time To (वेळेपर्यंत):** 23:59 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 13/10/2026 **Time (वेळ):** 18:19 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 032 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 13/10/2026 18:19 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 2 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** ला प्र विभाग कार्यालय, स्नेहनगर कॉंलनी नांदेड ,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रसुल बशिरसाब तांबोळी

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1982 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):**भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांद, भाग्य नगर, नांदेड, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांद, भाग्य नगर, नांदेड, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):**

Mobile (मोबाइल क्र.):
91-9987335769

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनोद किशनराव कंधारे | | | 1. धुम्रवर्ण अपार्टमेंटच्या बाज,Town/Village (शहर / गाव): शारदानगर,नांदेड ता जि नांदे,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): भाग्य नगर,District (जिल्हा): नांदेड,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | दिपाश्री विनोद कंधारे | | | 1. धुम्रवर्ण अपार्टमेंटच्या बाजु,Town/Village (शहर / गाव): शारदानगर,नांदेड ता जि नांदे,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): भाग्य नगर,District (जिल्हा): नांदेड,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

सरकार तर्फे फिर्याद दि. 13/10/2026

मी रसुल बशिरसाब तांबोळी, वय 44 वर्ष, व्यवसायः नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, मो.नं. 9987335769.

समक्ष सरकार तर्फे फिर्याद देतो की, मी जुन 2025 पासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, नांदेड येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिनांक 31/10/2023 रोजी तक्रारदार श्री दादाराव शिवाजी ढगे, व्यवसाय ठेकेदार, रा. पिंपळकौठा, ता. मुदखेड, जि. नांदेड यांनी तक्रार दिली की, मौजे केदारगुडा, पिंगळी, डोंगरगाव, हदगाव, गोरलेगाव गुरफळी रोड, एमडीआर 14 किमी 12/00 ते 17/00 ता. हदगाव, जि. नांदेड आणि केदारगुडा, पिंगळी, डोंगरगाव, हदगाव, गोरलेगाव, गुरफळी रोड एमडीआर 14 किमी 17/00 ते 22/00 ता. हदगाव, जि. नांदेड या रस्त्याचे दोन कामाचे टेंडर तक्रारदार दादाराव ढगे यांचे ओमकार कन्स्ट्रक्शन फर्मला मिळाले होते. सदर कामाच्या निवीदा स्विकृतीची शिफारस होणे बाकी होते. तक्रारदार दादाराव ढगे हे दिनांक 30/10/2023 रोजी 12:00 वाजताचे सुमारास लोकसेवक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांचे कार्यालयात भेट घेतली असता, त्यांनी तक्रारदार यांना मंजुर झालेल्या दोन टेंडरची एकुण 14 कोटी 10 लाख रूपयाच्या अर्धा टक्का रक्कम असे सरसकट 7,00,000/- (सात लाख) रूपयाची मागणी केली व सदरचे पैसे दिले तर पुढे मुख्य अभियंता नांदेड यांच्याकडे शिफारस करतो असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार दादाराव ढगे यांनी सदर टेबलचे संबंधीत श्री विनोद कंधारे, वरिष्ठ लिपिक, टेंडर विभाग यांना भेटले असता, त्यांनी सगळया सेक्शनसाठी प्रत्येक टेंडरचे 25000/- (पंचवीस हजार) रूपये असे एकुण 50,000/-(पन्नास हजार) रूपयाची मागणी केली. त्यावरून दिनांक 01/11/2023 रोजी तक्रारदार दादाराव ढगे यांना पंचासह लाच मागणी पडताळणी करिता पाठविले असता, लोकसेवक गजेंद्र हिरालाल राजपुत, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी तडजोडीअंती 6,00,000/- (सहा लाख) रूपयाची लाच स्विकारण्याची तयारी दर्शविली व तसेच संबंधित लिपिक श्री. विनोद कंधारे यांचेकडे गेले असता त्यांनी स्वतः साठी व संपुर्ण सेक्शनसाठी एकुण 40,000/-(चाळीस हजार रूपये) लाचेची मागणी केली. लाच मागणीची खात्री झाल्याने तक्रारदार यांना पंच क्र.1 यांच्यासह लोकसेवक विनोद कंधारे यांचे कार्यालयात पाठवले असता त्यांनी तक्रारदार यांचे कडुन स्वतःसाठी 40,000/-(चाळीस हजार रूपये) व लोकसेवक श्री. राजपुत यांचे करीता 6,00,000/- (सहा लाख) असे एकुण 6,40,000/- (सहा लाख चाळीस हजार रूपये) स्विकारले म्हणून यातील आरोपी लोकसेवक अधीक्षक अभियंता गजेंद्र राजपुत व विनोद किशनराव कंधारे यांचेवर यशस्वी सापळा कार्यवाही करून पोलीस स्टेशन भाग्यनगर, जि. नांदेड येथे गु.र.नं 403/2023 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7,7 A ,12 प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयातील आरोपी क्रमांक 2 यातील गै.अ. श्री विनोद किशनराव कंधारे वय-48 वर्ष व्यवसाय- नौकरी, पद वरिष्ठ लिपीक (वर्ग-3) नेमणुक- सार्वजनिक बांधकाम विभाग मंडळ कार्यालय ,नांदेड रा.घर नं.1-9-223 श्री, धुम्रवर्ण अपार्टमेंटच्या बाजुला, शारदानगर, नांदेड ता. जि. नांदेड यांच्या मालमत्तेची उघड चौकशी करण्याबाबत मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील जा.क्र. 2480/2024 दिनांक 01/03/2024 अन्वये आदेशित करण्यात आलेले असुन नमुद आदेश मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र, नांदेड यांचेकडील जा.क्र 1131/2024 दिनांक 04/03/2024 अन्वये इकडील कार्यालयास प्राप्त आहे.

नमुद उघड चौकशी तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री गजानन बोडके यांच्याकडे देण्यात आली होती व नमुद उघड चौकशी प्रकरणास उघड चौकशी क्रमांक-12/नांदेड/2024 असा क्रमांक प्राप्त झालेला आहे. त्यानंतर नमुद उघड चौकशी प्रकरण जुलै/2025 मध्ये पुढील चौकशी करीता पो.नि.श्री. बोडके यांच्याकडुन आमच्याकडे वरीष्टाच्या आदेशाने देण्यात आले.

गै.अ. विनोद कंधारे यांनी मार्च/2010 मध्ये प्रथम मालमत्ता संपादीत केली असल्याचे निष्पन्न झाल्याने गै.अ. यांचे विरूदधचे उघड चौकशी परिक्षण कालावधी दि. 01/03/2010 ते यशस्वी सापळा कार्यवाहीचा दिनांक 01/11/2023 असा परिक्षण कालावधी निश्चित करण्याची मान्यता मिळण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परीक्षेत्र, नांदेड यांना अहवाल सादर करण्यात आला. मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नांदेड यांनी त्यांचे कार्यालयाकडील जा.क्र. 2244/2024 दि. 08/05/2024 अन्वये दिनांक 01/03/2010 ते दिनांक 01/11/2023 पर्यंतचा परिक्षण कालावधी निश्चित करण्याची परवानगी दिली असल्याने सदर उ.चौ. मध्ये दिनांक 01/03/2010 ते दिनांक 01/11/2023 असा परिक्षण कालावधी गृहीत धरण्यात येवुन नमुद कालावधीचे गै.अ. यांचे उत्पन्न, खर्च व मालमत्ता याबाबत चौकशी तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री बोडके यांनी केली आहे.

नमूद उघड चौकशीत गै.अ. विनोद कंधारे व त्यांच्या कुटूंबियांची मालमत्ता, त्यांचा खर्च व त्यांचे उत्पन्न याबाबत गैरअर्जदार यांचेकडे सविस्तर विचारणा करून दिनांक 04/05/2024 रोजी त्यांचा सविस्तर जबाब नोंदविण्यात आला आहे. तसेच गैरअर्जदार नेमणूकीस असलेले शासकीय विभाग, संबंधित दुय्यम निबंधक, संबंधीत बँका, संबंधीत खाजगी कार्यालये, संबंधीत शाळा, संबंधीत तहसिलदार यांना पत्रव्यवहार करून उघड चौकशीचे अनुशंगाने माहिती संकलित करण्यात आली असता, गैरअर्जदार व त्यांचे कुटूंबीय यांचे नमूद उघड चौकशीचे परिक्षण कालावधीत खालील प्रमाणे उत्पन्न, खर्च व मालमत्ता असल्याचे दिसून येत असून उत्पन्न, खर्च व मालमत्ता यांचा तुलनात्मक विचार करता, त्यांनी त्यांचे उत्पन्नाच्या कायदेशीर व ज्ञात स्त्रोतांच्या विसंगत आढळून आले आहे. गैरअर्जदार विनोद किशनराव कंधारे, त्यांची पत्नी सौ. दिपाश्री विनोद कंधारे व त्यांचे वडील किशनराव कंधारे यांनी त्यांचे ज्ञात स्त्रोताचे उत्पन्नाच्या एकत्रित 95,74,851/- (अक्षरी पंच्यान्नव लाख, चौ-याहत्तर हजार आठशे एक्कावन्न रूपये) 65.83 टक्के अपसंपदा संपादित केल्याचे निष्पन्न झाले आहे.

गैरअर्जदार व त्यांचे कुटूंबीय यांचे अपसंपदेची एकत्रित गणना

अ.क्र.

विधान

विनोद कंधारे

सौ. दिपाश्री कंधारे

किशनराव कंधारे

एकुण

1
2
3
4
5
6
1

दिनांक 01/11/2023 रोजी असलेली मालमत्ता

(विधान ब) (परिक्षण कालावधीच्या शेवटी)

8272465
5383780
2920218
16576463
2

दिनांक 01/03/2010 रोजी असलेली मालमत्ता (विधान अ) (परिक्षण कालावधीच्या पुर्वी)

56000
00
751500
807500

3

परिक्षण कालावधीतील एकुण मालमत्ता (ब-अ)

8216465
5383780
2168718
15768963
4

परिक्षण कालावधीतील एकुण खर्च ( विधान ड)

4035360
3562961
751993
8350314
5

परिक्षण कालावधीतील एकुण मालमत्ता व खर्च (3+4)

12251825
8946741
2920711
24119277

6

परिक्षण कालावधीतील एकुण उत्पन्न ( विधान क)

6677105
4454444
3412877
14544426

7

अपसंपदा (5-6)

5574720

4492297

-492166

+9574851

8

अपसंपदा =अपसंपदा X 100

टक्केवारी एकुण उत्पन्न

83.49 टक्के

100.84 टक्के

-14.42 टक्के

65.83 टक्के

सदर उघड चौकशीमध्ये लोकसेवक विनोद कंधारे, त्यांची पत्नी सौ. दिपाश्री कंधारे व त्यांचे वडील किशनराव कंधारे यांनी त्यांचे ज्ञात स्त्रोताचे उत्पन्नाच्या एकत्रित 95,74,851/- (अक्षरी पंच्यान्नव लाख, चौ-याहत्तर हजार आठशे एक्कावन्न रूपये) 65.83 टक्के अपसंपदा संपादित केल्याचे निष्पन्न होत असल्याचे सदर चौकशीमध्ये या कार्यालयाचे अंतिम अहवाल जा.क्र. 2353/2026, दिनांक 12/08/2026 अन्वये अहवाल मा. महासंचालक, ला.प्र.वि. म.रा. मुंबई यांना मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नांदेड यांचे मार्फतीने सादर करण्यात आले तसेच सुधारित अंतिम अहवाल या कार्यालयाचे जा.क्र. 2354/2026, दिनांक 12/08/2026 अन्वये मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांना वरील प्रमाणे अपसंपदा निष्पन्न होत असल्याने अपसंपदा चा गुन्हा दाखल करून तपास करणे योग्य राहिल असा अहवाल सादर करण्यात आला होता. त्यावरून मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नांदेड यांनी त्यांचे जा.क्र. 2986/2026, दिनांक 10/09/2026 अन्वये मा. महासंचालक, ला.प्र.वि. म.रा. मुंबई यांचे कार्यालयात गैरअर्जदार विनोद कंधारे व त्यांची पत्नी सौ. दिपाश्री कंधारे यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 13 (1) (इ), 13 (2) व सुधारित भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 2018 चे कलम 13 (1) (ब), 13 (2), 12 सहकलम भारतीय न्याय संहिता - 2023 चे कलम 49 प्रमाणे गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश निर्गमित होणेच्या शिफारसीसह अहवाल सादर केला होता.

त्यावरून मा. महासंचालक, ला.प्र.वि. म.रा. मुंबई यांनी त्यांचे आदेश जा.क्र. 8963/2026, दिनांक 05/10/2026 व मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र,नांदेड यांनी त्यांचे आदेश जा.क्र. 3330/2026, दिनांक 09/10/2026 अन्वये गैरअर्जदार विनोद किशनराव कंधारे व त्यांची पत्नी सौ. दिपाश्री विनोद कंधारे यांचेविरूध्द अपसंपदेचा गुन्हा दाखल करण्याची मान्यता दिली आहे.

गैरअर्जदार विनोद कंधारे यांनी त्यांचे उघड चौकशी क्रमांक 12/वर्ग-3/नांदेड/2024 मध्ये दिनांक 01/10/2010 ते 01/11/2023 या परिक्षण कालावधीत गैरअर्जदार यांनी लोकसेवक पद धारण केलेल्या कालावधीत गैरअर्जदार विनोद किशनराव कंधारे व त्यांची पत्नी सौ. दिपाश्री विनोद कंधारे यांच्या मालमत्तेच्या उघड चौकशीमध्ये त्यांनी संपादित केलेल्या मालमत्तेबाबत ज्ञात स्त्रोताद्वारे संपादित केल्याचे पुरावे सादर करण्यासाठी वेळोवेळी संधी देण्यात आली होती. त्याबाबत गैरअर्जदार हे

पुष्टीदायक पुरावे सादर करू शकले नाहीत. गैरअर्जदार विनोद किशनराव कंधारे व त्यांची पत्नी सौ. दिपाश्री विनोद कंधारे यांनी त्यांच्या ज्ञात कायदेशिर उत्पन्नाच्या स्त्रोतापेक्षा एकत्रित 95,74,851/- (अक्षरी पंच्याण्णव लाख, चौ-याहत्तर हजार आठशे एक्कावन्न रूपये) 65.83 टक्के एवढी अपसंपदा संपादीत केल्याचे तसेच गैरअर्जदार यांची पत्नी सौ. दिपाश्री विनोद कंधारे वय 40 वर्ष, व्यवसाय खाजगी नोकरी, यांनी सदरची अपसंपदा स्वतःचे नावे बाळगून गैरअर्जदार विनोद कंधारे यांना गुन्हा करण्यास मदत करून प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले आहे.

म्हणून गैरअर्जदार विनोद किशनराव कंधारे, वय 48 वर्ष, पद वरिष्ठ लिपिक, तत्कालीन नेमणूक सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड व त्यांची पत्नी सौ. दिपाश्री विनोद कंधारे, वय 40 वर्ष, व्यवसाय खाजगी नोकरी, दोघे रा.घर नं.1-9-223 श्री, धुरमवर्ण अपार्टमेंटच्या बाजुला, शारदानगर, नांदेड ता. जि. नांदेड यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 13 (1) (इ), 13 (2) व सुधारित भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 2018 चे कलम 13 (1) (ब), 13 (2), 12 सहकलम भारतीय न्याय संहिता - 2023 चे कलम 49 प्रमाणे गुन्हा केल्याचे माझी त्यांचेविरूध्द सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1) Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SANTOSH BAPURAO TAMBE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

**(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Digitally Signed by: SANTOSH BAPURAO TAMBE
Rank: I (Inspector)
Unique No: 91159391001000001
On: 10/13/2026 7:24:36 PM
At PS: BHAGYANAGAR, NANDED

Rajabai
ठाणे अमलदार
पो स्टे. भाग्यनगर नांदेड

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SANTOSH BAPURAO TAMBE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** 15101000402SBTM8201Q

14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**